# देगलूर महाविद्यालयात रक्तदान शिबिर

देगलूर : अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय देगलूर, राष्ट्रीय सेवा योजना आणि कै.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ. संजय पाटील हे होते. यावेळी उपस्थित असलेले संदीप निळकंठे (अधीक्षक समाजसेवा) यांनी रक्तदानाचे महत्त्व समजावून सांगितले. या वेळी एकूण ३५ रक्तदात्यांनी रक्तदान करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद काळे यांनी केले तर आभार डॉ. खंदकुरे यांनी मानले. शिबिर व्यवस्थितपणे पार पडण्यासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. काशिंदे सुरेश, डॉ. येरावार संतोष, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. विठ्ठल जम्बाले, डॉ. रत्नाकार लक्षटे, डॉ. निरज उपलंचवार कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.